संदर्भ :- जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक १२.०८.२०२२. ठराव क्रमांक ८(६)

2021.09.04 19:59

क्रमाक/मबावि/क.सा/अंग.निर्लेखन/ 1113 / २०२२
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क) यांचे कार्यालय
जिल्हा परिषद चंद्रपूर
दिनांक २० सप्टेंबर २०२२

प्रति.

१. गट विकास अधिकारी
पंचायत समिती कोरपना,मूल.

२. बाल विकास प्रकल्प अधिकारी
ए.बा.वि.से.यो प्रकल्प कोरपना,मूल.

**विषय :- एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत अंगणवाडी केंद्र इमारतीचे निर्लेखन प्रस्तावाबाबत.**

**संदर्भ :- ज़िल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक १२.०८.२०२२. ठराव क्रमांक ८(६)**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सुचित करण्यात येते की, एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, **कोरपना,मूल** येथील अंगणवाडी इमारती बांधकाम पाडण्यासंदर्भात अंगणवाडी इमारत निर्लेखन प्रस्तावास संदर्भ क्रमांक १ अन्वये निर्लेखन प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर ठरावात मंजूर करण्यात आलेल्या अंगणवाडी इमारत निर्लेखनाच्या यादीनुसार तालुक्यातील गट विकास अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी ,उप अभियंता व संबंधित अंगणवाडी केंद्राअंतर्गत ग्रामपंचायतीतील ग्रामसेवक यांनी अंगणवाडी केंद्राच्या निर्लेखनाबाबतची पुढील कार्यवाही बांधकामाच्या शासकीय नियमावलीनुसार विहित मुदतीत विनाविलंब तात्काळ पुर्ण करण्यात यावी याची नोंद घ्यावी.

याबाबत तालुकास्तरावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल नमूद अंगणवाडी केंद्राच्या यादीनुसार या कार्यालयात उलट टपाली न चुकता सादर करावा.

**सहपत्र :- संदर्भिय ठरावाची सत्यप्रत.**

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क)
जिल्हा परिषद चंद्रपूर

प्रतिलिपी .

१. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद चंद्रपूर यांनां माहितीस सविनय सादर.
२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर यांना माहितीस सविनय सादर.
३. मा. अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर यांना माहितीस सविनय सादर.
४. मा. मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी ,जि.प.चंद्रपूर यांना माहितीस सविनय सादर.
५. कार्यकारी अभियंता, (बांध) जि.प.चंद्रपूर यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस समादराने अग्रेषित.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क)
जिल्हा परिषद चंद्रपूर

O/C

CamScanner

१३।९।२०


मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय, जिल्हा परिषद, चंद्रपूर

email id:dyceogzpchandrapur@gmail.com


क्रमांक/सा.प्र.वि./परिषद/सभा/ १८९४/२०२२ दिनांक :- ऑगस्ट, २०२२

०६ सप्टेंबर २०२२

# दिनांक १२.०८.२०२२ रोजी झालेल्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त

जिल्हा परिषद, चंद्रपूर
महिला व बालकल्याण विभाग
क्रमांक........................
दिनांक..०८.०९.२०२२
विभाग.....महावी. पि.अ.
जि.प.अ. / क.अ. / अधिकारी

प्रत माहितीस्तव सादर :-

१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर

२. मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर

प्रत माहितीस व कार्यवाहीस्तव सस्नेह अग्रेषित :-

१. खाते प्रमुख--उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण)---- जिल्हा परिषद, चंद्रपूर कार्यवृत्तातील दिलेले आदेश, मंजुरी, सुचना व उपस्थित केलेले मुद्दे, पारित ठराव यावर त्वरीत कार्यवाही करुन आपला अहवाल पुढील होणा-या सभेत न चुकता सादर करावा.

सचिव,
जि.प. सर्वसाधारण सभा तथा,
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद, चंद्रपूर

2021.09.04 19:59

CamScanner

ठराव क्रमांक ८(५)
ठराव सर्वानुमते मंजुर

**विषय क्रमांक ८(६) :- अंगणवाडी केंद्र निर्लेखन प्रस्तावास मंजुरी प्रदान करणेबाबत.**

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) :- विषय टिपणीचे वाचन केले.

**मा. अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** :-लोणी येथील इमारत इतक्या कमी कालावधीतच पडण्याच्या स्थितीत कशी आली. यासाठी संबंधितावर जबाबदारी निश्चित करून कार्यवाही करा.

**ठराव** :- कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडून खालील विवरणानुसार पंचायत समिती अंतर्गत नमुद अंगणवाडी केंद्राचे निर्लेखन प्रस्ताव मंजुरी करीता प्राप्त झालेले असुन, सदर ईमारत दुरुस्ती करणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. त्यामुळे निर्लेखन करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | तालुक्याचे नाव | अंगणवाडी इमारतीचे नांव | इमारत बांधकामाचे वर्ष | ईमारतीची मुळ किंमत | ईमारतीची उपयोगीता साहित्याची बाजारभावाने येणारी किंमत | ईमारतीची सद्याची किंमत | ईमारत निर्लेखन करण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोरपना | अंगणवाडी इमारत क्र. ५ कोल्हापूर गुडा | १९९७-९८ | ६६७९०/- | ११११७/- | १४२९/- | सदर इमारत फार जुनी असल्याने मोडकळीस आलेली आहे. भिंतीला भेगा पडल्या आहेत. इमारत सदयास्थितीत पडण्याचे स्थितीत आहे. खिडक्या वरील सज्जे पडण्याच्या स्थितीत आहे. |
| २ | कोरपना | लोणी | २००३-०४ | १०४७५०/- | २३८१४/ | ११९१/- | सदर इमारत फार जुनी असल्याने मोडकळीस आलेली आहे. भिंतीला भेगा पडल्या आहेत. इमारत सदयास्थितीत पडण्याचे स्थितीत आहे. खिडक्या वरील सज्जे पडण्याच्या स्थितीत आहे. |
| ३ | मूल | मुरमाडी | १९९१ | ८००००/- | १०३४४.९/- | ७१३६/- | सदर इमारतीच्या भिंतीला काही प्रमाणात भेगा पडलेल्या आहेत. तसेच खिडक्या दरवाजे काही प्रमाणात खराब झालेले आहे. |
| ४ | मूल | गोलाभूज (मुरमाडी) | १९९५ | ८००००/- | १०५५४.९/- | ९०१७/- | सदर इमारतीच्या भिंतीला काही प्रमाणात भेगा पडलेल्या आहेत. तसेच खिडक्या दरवाजे काही प्रमाणात खराब झालेले आहे. |
| ५ | कोरपना | धानोली | १९९२ | ७६०००/- | २३७४/- | ६९४/- | सदर इमारत फार जुनी असल्याने मोडकळीस आलेली आहे. भिंतीला भेगा पडल्या आहेत. इमारत सदयास्थितीत पडण्याचे |

CamScanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | स्थितीत आहे. खिडक्या वरील सज्जे पडण्याच्या स्थितीत आहे. |

सबब, उपरोक्त अंगणवाडी केंद्र निर्लेखन प्रस्तावास मंजुरी प्रदान करीत आहे. तसेच, जी इमारत बांधकाम आयुष्यपुर्व पडण्याच्या स्थितीत आहे, अशा इमारत बांधकामाशी संबंधित यंत्रणा यांचेवर जबाबदारी निश्चित करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

ठराव क्रमांक ८(६)
ठराव सर्वानुमते मंजुर

CS CamScanner